# -: जाहिर लिलाव :-

औद्योगिक न्यायालय, नागपूर, या कार्यालयाची मारूती ओमनी क्र.एम.एच.३१ ए.जी.९१२४ व एम.ए ३१ ए.जी.९१२५ ,असे दोन वाहन, सन २००० चे मॉडेल असलेले (येथुन पुढे वाहन असे संबोधिले आहे) जाह लिलावाद्वारे खालील अटी व शर्तीवर विकणे आहे.

**अटी व शर्ती :-**

१. **जाहीर लिलाव हा दिनांक २१/०१/२०१७ रोजी दु.३.०० वाजता** औद्योगिक व कामगार न्यायालयामध्ये होईल.

२. वाहन "आहे त्या स्थितीमध्ये","जेथे आहे तेथुन" विकणे आहे. सदरचे वाहन एकदा विक्री झाल्यानंतर कसल्याही प्रकारचा दावा किंवा वाद ऐकून घेतला जाणार नाही.

३. वाहन पाहणीसाठी सकाळी ११:०० ते दूपारी ३:०० वाजेपर्यंत लिलावाच्या दिनांकापूर्वीपर्यंत कामकाजाच्या दिवशी उपलब्ध राहील. या कार्यालयाचे सहाययक प्रबंधक किंवा वरिष्ठ लिपीक सदरचे वाहन दाखवतील.

४. वाहन खरेदीकरू इच्छिणा-या व्यक्तीने त्यांच्या आधारकार्डची छायांकित प्रत अथवा इतर फोटो ओळखपत्राची छायांकित प्रत कार्यालयात सादर करावी लागेल.

५. एकदा विक्री केलेले वाहन कूठल्याही परिस्थीतीमध्ये परत घेतले जाणार नाही.

६. वाहन खरेदी करू इच्छिणा-या व्यक्तीने,जाहिर लिलावापूर्वी अनामत रोख रक्कम रू. ५,०००/- जमा करणे आवश्यक राहील.

७. वाहन क्र.एम.एच.३१ ए.जी.९१२४ याची निर्धारित किंमत रू ४५,०००/- आहे. व वाहन क्र.एम.एच. ३१ ए.जी.९१२५ ची निर्धारित किंमत रू ४०,०००/- आहे. लिलावादरम्यान दोन वाहनाच्या निर्धारि किमती पेक्षा सर्वात जास्त बोली बोलणा-या व्यक्तीस वाहन विकले जाईल.

८. लिलावाद्वारे वाहन विकत घेणा-या व्यक्तीस लिलावापूर्वी संपूर्ण रक्कम धनादेशा द्वारे २४ तासांच्या आत सहायक प्रबधक औद्योगिक न्यायालय, नागपूर यांचे नावे या कार्यालयास जमा करावी लागेल. सदरची रक्कम कार्यालयाच्या खात्यावर जमा झाल्यावरच वाहन खरेदी ची पुढी प्रकीया करण्यात येईल.

९. प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर यांच्याकडील दप्तरी वाहन लिलावात खरेदी करणा-या व्यक्तीचे नांव नोंदवून,तशी नोंद आर.सी. बूकमध्ये झाल्यानंतर वाहन व वाहनाची चावी, ताब्यात दिली जाईल.

१०. वाहन खरेदी करणा-या व्यक्तीस वाहनाची चावी व इतर बाबी ताब्यात दिल्यापासून तिन दिवसांच्या आत (सुटटयासहित) वाहन स्व:खर्चाने या कार्यालयातून घेवून जावे लागेल.

११. वाहन खरेदी करणा-या व्यक्तीस वाहन त्याच्या नावावर करून घेण्याची सर्व कार्यवाही स्वत: करावी लागेल व त्यासाठी येणारा सर्व खर्चही सोसावा लागेल. तसेच वाहनाचा विमा, नोंदणी, पथकर इत्यादी सर्वबाबीसाठी येणारा खर्च वाहन खरेदीदारास करावा लागेल.

१२. वाहन जी व्यक्ती खरेदी करेल त्याव्यतिरिक्त इतर व्यक्तींची अनामत रक्कम त्वरीत परत केली जाईल. वाहन खरेदी करणा-या व्यक्तीची अनामत रक्कम वाहन घेवून जाताना परत केली जाईल.आठ दिवसांपर्यत वाहन न घेवून गेल्यास वाहन खरेदी करणा-या व्यक्तीची अनामत रक्कम जप्त केली जावू शकते.

१३. लिलावादरम्यान बोली स्विकारणे अथवा नाकारणे तसेच कोणतेही कारण नमूद न करता अटी व शर्ती मध्ये बदल किंवा दूरूस्ती करणे, इत्यादी सर्व अधिकार विक्री समिती राखून ठेवत आहे.

१४. वाहन विक्रीसंदर्भात या कार्यालयाचा निर्णय हा अंतिम व वाहन खरेदी करू इच्छिणा-या व्यक्तींवर बंधनकारक राहील.

आदेशावरून,

29.12.16

( आ.दे.भिवापुरकर)
सहायक प्रबंधक
औद्योगिक न्यायालय, नागपूर

O
seen
8/12
21/12


**कार्यालयाचा पत्ता :-**
औद्योगिक न्यायालय, नागपूर,
टेम्पल रोड, सिव्हील लाईन नागपूर. पीन कोड क्र. ४४०००१
दुरध्वनी क्र. २५६१४७१, २५५८१७७, ई-मेल :- icnagpur@rediffmail.com